**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८**
**मा. फ प्रभाग समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक –१०**

# सभावृत्तांत

दिनांक :– ०६/०२/२०२० वेळ :- स.११.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. फ प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक ०६/०२/२०२० रोजी स. ११.३० वा.फ प्रभाग कार्यालयाचे "राजर्षी शाहू महाराज" सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. योगिता ज्ञानेश्वर नागरगोजे | सभापती |
| २. | मा.कुंदन अंबादास गायकवाड | सदस्य |
| ३. | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | सदस्या |
| ४. | मा.दत्तात्रय बाबुराव साने | सदस्या |
| ५. | मा.अश्विनी भिमा बोबडे | सदस्या |
| ६. | मा.संजय बबन नेवाळे | सदस्य |
| ७. | मा. भालेकर प्रविण महादेव | सदस्य |
| ८. | मा.पौर्णिमा रविंद्र(आप्पा) सोनवणे | सदस्य |
| ९. | मा.पंकज दत्तात्रय भालेकर | सदस्य |
| १०. | मा.घोलप कमल अनिल | सदस्य |
| ११. | मा.उत्तम प्रकाश केंदळे | सदस्य |
| १२. | मा.पवळे सुमनताई मधुकर | सदस्या |
| १३. | मा.चिखले सचिन तुकाराम | सदस्य |
| १४. | मा. दिनेश लालचंद यादव | नामनिर्देशित सदस्य |
| १५. | मा.संतोष भाऊसाहेब मोरे | नामनिर्देशित सदस्य |
| १६. | मा.पांडुरंग गुलाब भालेकर | नामनिर्देशित सदस्य |

याशिवाय खालील अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.मनोज लोणकर-क्षेत्रिय अधिकारी, मा. वामन नेमाणे- प्रशासन अधिकारी, प्रवीण घोडे-कार्यकारी अभियंता(विद्युत), मा. व्ही.सी.काळे-प्र.कार्यकारी अभियता(जलनि:स्सारण), मा. मोहन निकम-लेखाधिकारी, मा.दगडे-पशुवैद्यकिय अधिकारी, मा. शहाजी गायकवाड-उपअभियंता (पा.पु.),मा. किशोर महाजन-उपअभियंता(जलनि:स्सारण), श्री अशोक आडसुळे-उपअभियंता(विद्युत), मा.जाधव व्ही.के.-उपअभियंता (स्थापत्य उद्यान), मा.सुनिल शिंदे-उपअभियंता- (नगररचना) , मा.डी.जे.शिर्के-सहाय्यक आरोग्याधिकारी, श्री कोंढरे एस.आर.-प्रशासन अधिकारी (अतिक्रमण), श्री कुर्ले सी. जी.-कनिष्ठ् अभियंता, श्रीमती प्राजक्ता गव्हाणे-कनिष्ठ अभियंता(स्थापत्य्-उद्यान, श्री लांडगे एस.एन.-अतिक्रमण निरिक्षक, श्री गोसावी जी.आर. - सहा.उद्यान अधिक्षक, श्री ठाकर व्ही.बी.-लिपिक,

Scanned with CamScanner

मा.सभापती योगिता ज्ञानेश्वर नागरगोजे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाज सुरु करणेस अनुमती दिली.

दि. 02/1/2020 रोजी स.11.30 वा. झालेल्या मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक ०७) कायम करणेत येत असल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

मा.सभापती व उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने सभेत खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक-२ मा.सचिन चिखले सदस्य् यांचा दिनांक ६/२/२०२० रोजीचा प्रस्ताव.
निगडी प्रभाग क्र.१३ यमुनानगर मधील नाना-नानी पार्क उद्यानाची भिंत काढणेबाबत.
वरीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

---

विषय क्र - 1
दिनांक - 06/02/2020
सुचक- मा.योगिता नागरगोजे

ठराव क्र. - 13
विभाग – फ क्षेत्रिय प्रशासन विभाग
अनुमोदक- मा.प्रविण भालेकर

संदर्भ-१.मा.क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.फक्षेका/प्रशा/१/कावि/१२५/२०१९ दि.१/२/२०१९.
२.मा.फ प्रभाग समिती सभा ठराव क्रमांक ६ दिनांक ४/७/२०१९.

फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. 11 मधील विविध प्रकल्पांचे नामकरणाबाबत मा. फ प्रभाग समिती ठराव क्र. 19 दि. 04/12/2018 अन्वये सन्मा. प्रभाग समिती सदस्यांमार्फत ठेवलेला विषय सर्वानुमते मान्य करणेत आलेला असुन सदर ठरावान्वये घरकुल प्रकल्प कमान (प्रवेशद्वार)- १) लोकनेते गोपीनाथ मुंडे नगर २) समस्त नेवाळे मळा प्रवेशद्वार असे नामकरण करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

फेडरेशन ऑफ घरकुल सहकारी गृहरचना संस्था मर्या. चिखली, भारिप बहुजन महासंघ व संविधान दिन सोहळा समिती यांनी दि. 01/01/2019 चे पत्रानुसार घरकुल प्रकल्प कमानीचे नामकरणास विरोध दर्शविला आहे.

दिनांक 23/01/2019 रोजी आपले सरकार वेबपोर्टलवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने केलेला ठराव दुरुस्त करुन घरकुलचे नामकरण हे प्रचलित नावाप्रमाणेच घरकुल नवनगर संकुल करण्यात यावे अशी तक्रार दाखल केली आहे.

तसेच भगवानबाबा प्रतिष्ठाण – मोरवाडी, जयभगवान महासंघ - पिंपरी चिंचवड परिवर्तन पार्टी पिंपळे गुरव या यांनी दि. 16/01/2019 व 21/1/2019 चे पत्रान्वये घरकुल प्रकल्पाचे "स्व. गोपीनाथ मुंढे नगर" नामकरण करणेबाबत समर्थन केलेले आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे काही संस्थांनी विरोध दर्शविला असून काही संस्थांनी सहमती दर्शविलेली आहे. तरी सदरचा घरकुल नामकरणाबाबतचा विषय नजीकच्या मा. प्रभाग समिती सभेमध्ये अवलोकनार्थ सादर करणेत यावा.

सदर विषयाबाबत सांगोपांग चर्चा झाली असता सदरचा विषय मा. आयुक्त यांचेकडील सार्वजनिक जागांना नावे,क्रमांक देणेबाबतचे परिपत्रक क्र.भुजि/९/कावि/९/२०२० दिनांक २/१/२०२० नुसार फ प्रभाग समिती ठराव क्र. 19 दि. 04/12/2018 स्थगित ठेवणेत यावा असे सर्वानुमते ठरले.

सदर विषय सर्वानुमते स्थगित ठेवणेत आला.

---

Scanned with CamScanner

यानंतर खालीलप्रमाणे ऐनवेळेसचे विषय चर्चेसाठी घेणेत आले.

विषय क्र - 2

ठराव क्र. - 14

दिनांक - 06/02/2020

विभाग – सदस्य प्रस्ताव

सुचक- मा.सचिन चिखले/ सुमनताई पवळे

अनुमोदक- मा.कमल घोलप/उत्तम केंदळे

संदर्भ-१.मा.सचिन चिखले, सदस्य् यांचा दिनांक ६/२/२०२० रोजीचा अर्ज.

निगडी प्रभाग क्रमांक १३ यमुनानगरमध्ये नाना-नानी पार्क उद्यान आहे. सदर उद्यानाच्या उत्तर बाजूला २५.० मीटर लांब व ३.०० मीटर उंचीची सिमाभिंत असून त्या पलिकडे १.५० मिटर रुंदीचा पाथवे आहे. सदर पाथवेचा कचरा टाकणे व इतर अवैध वापर होत आहे. त्यामुळे सदरची भिंत पाडून ती जागा उद्यानात घेणे आवश्यक आहे. तरी सदरची भिंत पाडून टाकणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर विषय सर्वानुमते मान्य झाला.

-----------------------------------

यानंतर मा. सभापती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

(योगिता नागरगोजे)
सभापती
फ प्रभाग समिती
निगडी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय,निगडी ४४
क्र.फक्षेका/सभा/कावि/१२ /२०२० दिनांक१५/०२/२०२०.

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
फ प्रभाग समिती
निगडी.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Scanned with CamScanner